आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारची मंजुरी

- शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक, महसूल विभागातला सर्वात मोठा घोटाळा उघड झाल्याची महसूल मंत्र्यांची माहिती

- संगमनेर तालुक्यात १२ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करायचे राज्य शासनाचे आदेश

- देशातल्या शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजी

**आणि**

- राज्याच्या बहुतांश भागात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**<><><><><>**

व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यामुळं या ग्राहकांना आता मासिक वापराच्या सरासरीच्या ३० टक्के एलपीजी मिळेल. अधिकाधिक व्यावसायिक ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसचा वापर करावा यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन पेट्रोलियम सचिवांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने आज २०२३-२४च्या कापूस हंगामासाठी भारतीय कापूस महामंडळाला १ हजार ७१८ कोटी रुपयांच्या किमान आधारभूत किंमत निधीला मंजुरी दिली. २०२३-२४ च्या कापूस हंगामात ११४ लाख ४७ हजार हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असण्याचा अंदाज असून ३२५ लाख २२ हजार गाठी इतकं उत्पन्न अपेक्षित आहे. हा आकडा जागतिक स्तरावरच्या कापूस उत्पादनाच्या जवळपास २५ टक्के आहे.

**<><><><><>**

शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक महसूल खात्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली आहे. राज्याच्या महसूल खात्यातला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत दिली. महसूल विभागाच्या कलम १५५चा गैरवापर करून सातबारा उताऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार झाले. काही ठिकाणी बेकायदेशीररित्या जमीन हस्तांतरणही करण्यात आल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे.

अनिल परब यांनी ही लक्षवेधी मांडली होती. पुणे जिल्ह्यात २०२५ मध्ये जुलै-ऑगस्ट दरम्यान हा प्रकार उघडकीला आला होता. याप्रकरणी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आल्याची माहिती महसूल मंत्र्यांनी दिली. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील, तसंच राज्यभरातल्या सर्व संशयित नोंदी रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून पुढच्या सात दिवसात कारवाई सुरू होईल, असं बावनकुळे म्हणाले.

**<><><><>**

अहिल्या नगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यात वडगाव पान परिसरात एका अल्पवयीन मुलीवर काल अज्ञात व्यक्तीनं ॲसिड फेकलं. ही मुलगी संगमनेरच्या एका विद्यालयात इयत्ता पाचवीमध्ये शिक्षण घेते. ती शाळेतून घरी जात असताना ही घटना घडली. या हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाली झाली असून तिच्यावर लोणी प्रवरा इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलीस या घटनेचा तपास करत असून हल्लेखोराचा शोध सुरू आहे. या अमानुष कृत्याच्या निषेधार्थ आज संगमनेरच्या तळेगाव फाटा, वडगाव पान येथे सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात हजारो नागरिक सहभागी झाले होते. संशयित आरोपीवर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

याप्रकरणाची प्रकरणाची सखोल चौकशी करायच्या सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत, असं आश्वासन गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिलं. ॲसिड सहज उपलब्ध होऊ नये, यासाठी समिती स्थापन करून उपाययोजना करण्यात येतील, असं आश्वासन भोयर यांनी दिलं.

**<><><><>**

वन्यजीव संरक्षण महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत बहुमतानं मंजूर झालं. वनमंत्री गणेश नाईक यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. आधीच्या कायद्यानुसार वन्यजीवांच्या संख्येचं व्यवस्थापन करण्यासाठी, स्थानांतरण करण्यासाठी, तसंच शिकारीसाठी केंद्र सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक होती. त्यामुळे राज्यात उद्भवलेला मानव- बिबट्या संघर्ष हाताळण्यात विलंब होत आहे. म्हणून राज्य सरकारच्या परवानगीनं बिबट्यांचं स्थानांतरण करणं, संख्येचं व्यवस्थापन करणं यासाठी वन्यजीव रक्षकाला आवश्यक पावलं उचलण्याची तरतूद या विधेयकात केली आहे, असं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्र मुद्रांक दुसरी सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत एकमतानं मंजूर झालं. अनेक प्रकरणांमध्ये कमी मुद्रांक भरून दस्त नोंदवले जातात आणि नंतर ती प्रकरणं उघडकीला येतात. अशा वेळी विद्यमान कायद्यानुसार सहा वर्षांच्या मर्यादेमुळे शासनाला उर्वरित शुल्क वसूल करण्यात अडथळे येत होते. या पार्श्वभूमीवर सुधारणा करताना सहा वर्षांच्या कालावधीत संबंधितांना नोटीस देणं बंधनकारक केलं असून, त्यानंतर प्रकरण अंतिम होईपर्यंत ते सुरू ठेवता येणार आहे. त्यामुळे प्रलंबित सुमारे १ हजार ९०० हून अधिक प्रकरणांमध्ये अडकलेला कोट्यवधींचा महसूल वसूल करण्यात मदत होणार आहे, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><><>

भोंदूगिरी करणारा स्वयंघोषित ज्योतिषी अशोककुमार खरात याला नाशिक पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे. एका पिडित महिलेनं त्याच्याविरुद्ध सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीवरून बलात्काराचा गुन्हा खरातविरुद्ध नोंदवून मध्यरात्री त्याला अटक करण्यात आली.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली तेजी आज सलग तिसऱ्या दिवशी कायम राहिली. दिवसअखेर सेन्सेक्स ६३३ अंकांची वाढ नोंदवून ७६ हजार ७०४ अंकांवर बंद झाला. निफ्टी १९७ अंकांनी वधारुन २३ हजार ७७८ अंकांवर स्थिरावला. सत्रादरम्यान दोन्ही निर्देशांकांनी यापेक्षा मोठी वाढ नोंदवली होती. इराण, इस्त्राइल आणि अमेरिका युद्धामुळं झालेल्या घसरणीचा लाभ उठवत गुंतवणूकदारांनी खरेदी केल्यानं ही तेजी दिसून येते आहे, असं विश्लेषकांचं मत आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१८ मार्च २०२६ - बुधवार

**<><><><><>**

राज्यात आज काही ठिकाणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी आणि उपाध्यक्षपदासाठी निवडणुका झाल्या.

**परभणी** जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपच्या लता वाकळे तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीकांत विटेकर यांची बिनविरोध निवड झाली.

**सांगली** जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संगीता पाटील तर उपाध्यक्षपदी काँग्रेस पक्षाचे ऋषिकेश लाड यांची निवड झाली.

**सोलापूर** जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे दीपक वैद्य तर उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार यांची बिनविरोध निवड झाली.

**<><><><><>**

देशात जबाबदार, पारदर्शक आणि विश्वासार्ह जाहिरात व्यवस्थेची गरज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी व्यक्त केली आहे. Advertisement Standard Council of India नं मुंबईत आयोजित परिषदेत ते बोलत होते.

- **- - होल्ड - जाजू बाइट - - -**

जाजू यांनी डिजिटल जाहिरातींशी संबंधित धोके देखील अधोरेखित केले. यामध्ये आर्थिक फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या गुंतवणूक संदर्भातल्या जाहिराती आणि बनावट नोकरीच्या ऑफर्स यांचा समावेश असल्याचा उल्लेख त्यांनी केला. व्यावसायिक अभिव्यक्ती ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा एक भाग असली तरी, दिशाभूल करणाऱ्या आणि फसव्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवलं जाऊ शकते आणि ठेवलं पाहिजे, हे त्यांनी अधोरेखित केलं.
दुपारी जाजू यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेकनॉलॉजी या संस्थेला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

**<><><><><>**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली एक्झिट जवळच्या नवीन बोगद्यानजीक आज दुपारी झालेल्या भीषण अपघातात 3 जणांचा जागीच मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर हा अपघात घडला.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे यांना आज पुणे महापालिकेत नोकरीचं नियुक्तीपत्र देण्यात आलं. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आसावरी जगदाळे यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधून त्यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतांश भागात आज वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. काही ठिकाणी गारपीट आणि विजांचा कडकडाट होण्याचीही शक्यता आहे. राज्याच्या सुमारे अर्ध्याहून अधिक जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांचा यात समावेश आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भाचा उत्तर भागात यलो अलर्ट आहे.

सातारा शहर परिसरात आज दुपारी चारच्या सुमाराला हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.

नाशिक जिल्ह्यात निफाड, ओझर या भागात तसंच सिद्धपिंप्री पट्ट्यात आणि नाशिक शहरात पावसानं हजेरी लावली.

**//<><><><><>//**